**क्रमांक :-पोमसं/२८-ओ/४९३७/मपोकनिस बैठक/४३९(०५)/२०१७,** **मुंबई, दिनांक :-** ०८/०८/२०१७

**विषय :-** **मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या दि. २५.०७.२०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त पाठविण्याबाबत.**

* * * * *

मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीची बैठक, मंगळवार, **दि. २५.०७.२०१७** रोजी महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. तसेच, सदरचे इतिवृत्त www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH → Others → Minutes of welfare meeting या शिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. तरी खालील अधिका-यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरचे कार्यवृत्त त्यांचे अधिपत्याखालील सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

**(अनुप कुमार सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई (सस्नेह)
सर्व अपर पोलीस महासंचालक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह).
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक (मो.प.वि. / न.वि.अ. / वि.सु.वि. / फोर्स वना / म.अ.प्र.वि. / रा.रा.पो.बलसह)
पोलीस उप महारीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प ागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / मोटार परिवहा / अे.सी.बी. / बितारी संदेश).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे (अ.अ.प्र.केंद्र, नागपूर / रा.रा.पो.बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंडसह).
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरीक्षक (नि.वे) / (आस्थापना -१).
सर्व उपसहायक पोलीस महानिरीक्षक
सर्व कार्यासन अधिकारी.
पोलीस महासंचालक यांच्या लघुलेखिका.

**प्रत,**

प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.रा. यांचे कार्यालय, मुंबई.

२/- प्रभारी अधिका-यांनी सोबत जोडलेले इतिवृत्त उपरोक्त नमूद संकेतस्थळावर एक महिन्याच्या कालावधीसाठी प्रसिध्द करावे.

25.7.2017 Welfare Meetings minites

**मंगळवार दि. २५.०७.२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या मध्यवर्ती पोलीस कल्याणनिधी व्यवस्थापन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

** ** **

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी व्यवस्थापन समितीची बैठक या कार्यालयात **मंगळवार दि. २५.०७.२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता** आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी व्यवस्थापन समितीचे खालील पदाधिकारी उपस्थित होते :-

| अ.क्र. | समिती सदस्यांचे पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २ | अपर पोलीस महासंचालक (का . व सु.),म.राज्य, मुंबई | |
| ३ | अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती ), म.राज्य, मुंबई | |
| ४ | अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.रा., मुंबई | सदस्य |
| ५ | अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),म.रा., मुंबई | |
| ६ | अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म.रा., मुंबई | उपाध्यक्ष |
| ७ | अपर पोलीस महासंचालक ( नि . व स.),म.रा., मुंबई | - |
| ८ | विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण व खास पथके), म.राज्य,मुंबई | - |
| ९ | विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), म.रा., मुंबई | - |
| १० | विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),म.रा., मुंबई | |
| ११ | विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर. | |
| १२ | पोलीस आयुक्त, सोलापूर शहर | सदस्य |
| १३ | पोलीस उप महानिरीक्षक, बिनतारी संदेश विभाग, पुणे | सदस्य |
| १४ | सहायक पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), | - |
| १५ | पोलीस अधीक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| १६ | अपर पोलीस अधीक्षक कोल्हापूर करिता - PI संजय मोरे | सदस्य |
| १७ | श्रीमती रेखा साळुंखे, पो.नि. पुणे शहर | सदस्य |
| १८. | श्री. जी.जी. रांजणकर, पो.नि. उस्मानाबाद,SOPO निलंगा लातूर | सदस्य |
| १९ | श्री. विजय बावस्कर, पो.हवा./५१६, पो. अ., अकोला | सदस्य |
| २० | श्री. सुनिल कनोजिया पो.हवा. मपोअ,नाशिक. | |
| २१ | श्रीमती मंदा सातपुते, म.पो.शि./१४५६ पो. अ., अमरावती ग्रामीण | सदस्य |
| २२ | श्री. प्रणव बच्छाव, पो.शि../१६१७, पो. अ., नाशिक ग्रामीण | सदस्य |

25.7.2017 Welfare Meetings minites

अध्यक्षांनी सर्वप्रथम बैठकीतील सर्व उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांनी म.पो.क.नि. व्यवस्थापन समितीच्या मागील दि. २३/११/२०१६ च्या बैठकीतील एकूण २ मुद्यांवरील पुर्तता अहवालाचा आढावा घेतला. त्यावरील चर्चेअंति घेण्यात आलेल्या ठरावांचा तपशील सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद करण्यात आला आहे. सदरच्या मुद्दयांबाबत पुर्तता झाल्यामुळे सदरचे मुद्दे निकाली निघाले. त्यानंतर , म. पो. क. नि. व्यवस्थापन समितीच्या मंगळवार दि. २५.०७.२०१७ च्या सदर बैठकीसाठी घटकांकडून तसेच या कार्यालयाकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या एकूण ७ मुद्दयांवर चर्चेअंति घेण्यात आलेल्या ठरावांचा तपशील सोबतच्या "परिशिष्ट - आ" मध्ये नमूद करण्यात आला आहे. ऐनवेळी उपस्थित झालेले मुद्दे, व त्यावरील चर्चेअंति घेण्यात आलेल्या ठरावांचा तपशील सोबतच्या परिशिष्ट 'इ' मध्ये नमूद करण्यात आला आहे. तसेच, पोलीस महासंचालक,म.राज्य, मुंबई यांनी दिलेली माहिती/दिलेले निर्देश याबाबतची माहिती परिशिष्ट "ई " मध्ये नमूद करण्यात आली आहे.

या बैठकीत ठेवण्यात आलेल्या सर्व मुद्दयांवर चर्चा / निर्णय झाल्यानंतर, अध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

---ooo---

**मागील दि.२३/११/२०१६ रोजी झालेल्या पोलीस कल्याण निधी समितीच्या बैठकीतील मुद्दयांवर घेण्यात आलेला ठराव/निर्णयाबाबत/पूर्तता अहवाल**

**परिशिष्ट - "अ "**

| अ. क्र | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | मागील दि. दि.२३.११.२०१६ च्या बैठकीतील ठराव | दि. २५.०७.२०१७ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|---|
| १ | पो.अ. सांगली | पोलीस कल्याण निधीमधुन रु. ५ हजार पर्यंतच्या किरकोळ खर्चास मंजूरी देण्याबाबतचे अधिकार पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) यांना प्रत्यायोजित करणे. | अशा प्रकारे अधिकाराचे प्रत्यायोजन करणे शक्य नाही. कल्याणकारी योजनेअंतर्गत चालविण्यात येत असलेली पिठाची गिरणी, दुग्ध व्यवसाय, गॅस एजन्सी हे सर्वत्र सहज उपलब्ध होत असल्याने अशा योजनांचा आढावा घेऊन त्या बंद करण्याबाबत कार्यवाही करावी. व चालू असलेल्या कल्याणकारी योजनांवर पोलीस खात्यातील माणसे नेमणे योग्य नाही याबाबत दि. १८/३/२०१६चे परिपत्रकान्वये सर्व घटकांकडून मागविण्यात आलेली माहिती संकलित करुन पुर्नविलोकन करण्यात यावे असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले. | पोलीस कल्याण निधीमधून रु.५ हजार पर्यंतच्या किरकोळ खर्चास मंजुरी देण्याबाबतचे अधिकार पोलीस अधीक्षक यांनाच राहतील. <br> **मुद्दा सर्वानुमते अमान्य करण्यात आला .** |
| | पो.अ. चंद्रपूर | ड) मध्यवर्ती तसेच घटक पोलीस कल्याण निधीला भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून विमा एजंसी मिळाल्यास प्रत्येक वर्षाला पोलीस विभागात भरती होणा-या नवीन उमेदवारांकडून विमा पॉलीसी काढता येईल तसेच नियमित कर्मचा-यांकडून विमा पॉलीसी काढण्यात आल्यास त्यावर मिळणारे कमिशन पोलीस कल्याण निधीला मिळू शकेल. त्यामुळे निधीला हक्काचे मिळकतीचे साधन उपलब्ध होवू शकते. याकरिता अशा प्रकारची विमा एजंसी गडचिरोली पोलीस येथे यापूर्वीच कार्यन्वित असल्याचे विचारात घेण्यात आलेले आहे. | भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून विमा एजन्सी मिळण्याबाबत आयुर्विमा महामंडळाच्या वरिष्ठ अधिका-यांना चर्चेसाठी बोलाविण्याबाबत मा.अध्यक्षांनी निर्देश दिले. | LIC एजंट म्हणून काम करण्याचे पोलीस कर्मचा-यास प्रशिक्षण कोण देणार,प्रशिक्षणाचा खर्च किती असेल, ट्रेनिंग घेतल्यानंतर तो पोलीस विभागा व्यतिरिक्त इतर कामे करणार नाही का, तसेच LIC पॉलीसी परिपक्व (mature)झाल्यानंतर त्याची रक्कम घेण्याचा कर्मचा-यास विसर पडतो. ती रक्कम त्याच्यापर्यंत किंवा त्याच्या कुटुंबियापर्यंत कशी पोहोचेल याबाबत एलआयसी अधिका-याशी चर्चा करुन माहिती घ्यावी. <br> **(कार्यवाही का.क्र.२८-अे)** <br> जुन्या पॉलीसी मॅच्युअर (mature) झाल्या आहेत पण त्याची मागणी करण्यासाठी कर्मचा-याचा शोध घेवून ती रक्कम त्याच्यापर्यंत पोहचविण्याची काळजी घ्यावी. <br> **(कार्यवाही का.क्र.२८)** |

**मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीच्या बैठकीमध्ये चर्चेसाठी प्राप्त मुद्दे.**

**परिशिष्ट - "आ "**

| अ.क्र | विषय सूची घटक | विषय / मुद्दा | दि.२५/०७/२०१७ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| १ | विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र, नांदेड | पोलीस अधीक्षक, नांदेड कार्यालयाच्या वार्षिक परीक्षणांतर्गत आयोजित पोलीस दरबारामध्ये सहायक पोलीस उपनिरीक्षक श्री. ढगे नेमणूक कंधार पोलीस स्टेशन, जि. नांदेड हे सेवानिवृत्त होत असून त्यांनी असे सुचविले की, पोलीस कर्मचारी सेवेत आल्यानंतर त्यास पोलीस विभागाकडून पोलीस किट साहित्य ठेवण्यासाठी लोखंडी किट पेटी देण्यात येते. सदर किट पेटी ही सेवेत ३० ते ४० वर्षापर्यंत त्याचे सोबत असते सदर किट पेटीशी त्याचे भावनिक नाते निर्माण होत असते अशा वेळी सेवानिवृत्तीचे वेळी सदर किट पेटी मुख्यालयात जमा करावी लागते.<br>पोलीस कर्मचाऱ्यास त्याच्या सेवेची आठवण म्हणून सदर किट पेटी त्यास देण्यात यावी व त्यासाठी काही शुल्क आकारल्यास ते देखील देण्यास तयार आहे. | पोलीस कर्मचा-यांना किटपेटी सेवानिवृत्तीनंतर स्वतःकडे ठेवण्याबाबत पोलीस नियमावली भाग २ मधील नियम १० (५) मधील तरतूदीनुसार किटपेठी पुनः वापरण्यायोग्य नसल्याचे घटक प्रमुखांचे मत झाल्यास ती त्या कर्मचाऱ्यास देण्यास हरकत नाही.<br>**मुद्दा निकाली निघाला.** |
| २ | समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. १४, औरंगाबाद | महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील रा.रा.पो.बल तसेच इतर विविध शाखेमध्ये काम करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना वेळो-वेळी वेगवेगळ्या ठिकाणी शासकीय कामकाजास्तव किंवा इतर कामास्तव महाराष्ट्र किंवा महाराष्ट्राबाहेर जावे लागते. त्यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारे रेल्वेमध्ये तात्काळमध्ये रिझर्वेशन दिले जात नाही. त्यामुळे शासकीय काम करताना पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना प्रवासामध्ये नाहक अडचणींना सामोरे जावे लागते.<br>तरी महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना शासकीय महामंडळाच्या बस तसेच रेल्वेमध्ये तात्काळमध्ये राखीव सीट्स् उपलब्ध होण्याकरिता शासन स्तरावरून आदेश पारीत होण्याकरिता आवश्यक तो पत्रव्यवहार होणेस विनंती आहे. | सदरचा मुद्दा पोलीस कल्याण निधीशी संबंधित नसल्यामुळे तो कर्मचारी वृंद परिषदे मध्ये मांडण्यासाठी समादेशक, रारापोबल गट क्र. १४ औरंगाबाद यांनी पाठवावा.<br>**मुद्दा निकाली निघाला.** |
| ३ | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | **महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत अनुदान :-**<br>आपले कार्यालयाकडील परिपत्रक क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / पो.कर्म.महा.दर्शन/ १८४/ (१६) २०१७, दि.१८.२.२०१७अन्वये पोलीस शिपाई ते सहायक फौजदार दर्जाच्या पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना जे कर्मचारी महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत अनुदान (रु. १,०००/- ) देणेबाबत तरतूद केलेली आहे.<br>तरी पोलीस कल्याण निधीचे सदस्य असणाऱ्या लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना, वर्ग ४ चे कर्मचारी यांना रजा प्रवास सवलत अनुदान योजना लागू करण्यात यावी. | नियमितरित्या पोलीस कल्याण निधीची वर्गणी भरत असेल अशा पोलीस शिपाई ते सहायक फौजदार दर्जाच्या पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत अनुदान (रु. १,०००/- ) देणेबाबत तरतूद केलेली आहे.<br>त्याचप्रमाणे पोलीस कल्याण निधीचे सदस्य असणा-या व नियमितरित्या पोलीस कल्याण निधीची वर्गणी भरत असणा-या प्रमुख लिपिक, वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक व ग्रेड पे ४२००/- पर्यंत असणा-या लिपिक वर्गीय कर्मचारी व वर्ग-४ चे कर्मचारी यांना रजा प्रवास सवलत अनुदान योजना लागू करण्याबाबत मा.अध्यक्षांनी मान्यता दिली आहे.<br>**त्यानुसार परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | कार्यालयीन ज्ञापन क्र.२८/४९३७/ मपोकुआयो/४३/२०११, दि.८.३.२०१७ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्ग पोलीस व त्यांचे कुटुंबिय सदस्य रुग्णालयामध्ये उपचार घेत असताना उपचाराचा कालावधी ८ दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाल्यास घटक प्रमुख व १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी विपोमनि/पोलीस आयुक्त यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेणेबाबत आवश्यक असते. अशावेळी रुग्णाचा रुग्णालयातील कालावधी वाढल्यास घटक प्रमुख अथवा विभाग प्रमुखांची ना-हरकत प्रमाणपत्र रुग्णालयास विहित कालावधीत प्राप्त न झाल्यास रुग्णास डिस्चार्ज देण्यात येत नाही. त्यामुळे रुग्णाचा उपचार खर्च वाढला जावून त्यामध्ये शासकीय नुकसान होवू शकतो. तसेच रग्णालयाकडून देयके वेळेत प्रदानासाठी पाठविण्यास विलंब होतो तरी महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णालयात दाखल पोलीस अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांचे कुटुंबियांना उपचार घेत असताना उपरोक्तप्रमाणे वास्तव्याच्या कालावधीची मंजुरी घेणेबाबतची तरतूद कमी करण्यात यावी. | याबाबत ८ ते १५ दिवसांपर्यंत व १६ ते २१ दिवसांपयंत वास्तव्यासाठी TPA कडून, व २१ दिवसानंतर पोलीस महासंचालक कार्यालय,म.राज्य, मुंबई यांच्याकडून NOC देण्याबाबत निर्णय झालेला असून, त्याबाबतचे परिपत्रक दि. १२.७.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.<br>**मुद्दा निकाली निघाला** |
| ५ | महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.,मुंबई व त्यांच्या अधिनस्त कार्यालयात विविध घटकातून प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या मासिक वेतनातून नियमाप्रमाणे पोलीस कल्याण निधी वर्गणीची कपात करण्यात येते. लाप्रवि परिक्षेत्र, ठाणे, पुणे व औरंगाबाद वगळता इतर सर्व परिक्षेत्रातील वर्गणी संबंधित घटकांकडे वर्ग करण्यात करण्यात येते. लाप्रवि, म. राज्य, मुंबई येथे कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली वर्गणी पोलीस महासंचालक कार्यालयाकडे वर्ग करण्यात येते.<br>महासंचालक, लाप्रवि या कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारचा पोलीस कल्याण निधी उपलब्ध नसल्याने दि.२९.९.२०१५ च्या सुधारित पोकनि नियमावलीनुसार पोकनिचे सदस्य असलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना पुस्तक अनुदान, उच्चशिक्षण, त्यांचे आजाराकरिता औषधे, वैद्यकीय सुविधा, उपयंत्र, उपकरण संचाकरिता कर्ज अनुदान , अंत्याविधीकरिता अनुदान तसेच इतर बाबीतील कर्ज अनुदान पुरविणे शक्य नाही त्यामुळे राज्यातील लाप्र विभागातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची पोकनिची १००% रक्कम पोलीस महासंचालक कार्यालयास वर्ग करणे संयुक्तिक होईल. | अपोमसं, द.वि.प. आणि विपोमनि, फोर्स वन, मुंबई दोन घटकांचा मिळून एक स्वतंत्र घटक पोलीस कल्याण निधी सुरु करण्यात यावा. त्याचे संनियंत्रण अपोमसं, द.वि.प.यांचेकडून करण्यात येईल. असे मा.अध्यक्षांनी निर्देश दिले.<br>तसेच राज्याातील पोलीस विभागातील ओ.सी.बी./गु.अ.वि./रा.गु.वि. पथक प्रमखांनी त्यांच्या कार्यालयातील व राज्यातील त्यांचे विविध घटक कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी व पोलीस कल्याण निधीच्या सभासदांकडून अदत्त चौमाही वर्गणी जमा करून, जमा रक्कम स्वत:चे घटक कल्याण निधीत जमा करून, त्यातील २५% रक्कम मध्यवर्ती पोकनिमध्ये जमा करण्यासाठी पोमसं. कार्यालयास पाठवतील व अशा कार्यालय/घटक/पथकातील पोलीस अधिकारी/ कर्मचारी आणि सभासद लिपिक वर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांना पोकनि अंतर्गत अनुज्ञेय लाभ उपलब्ध करून देतील. अशाप्रकारे पोलीस कल्याण निधी नियमावली मधील नियम ८ (२) अ (२) मध्ये दुरुस्ती करण्यासाठी नियमांचा मसुदा बनवून तो महासंचालक असेबी, अपोमसं गुअवि, आयुक्त रागुवि यांना पाठवून त्यावर त्यांचे अभिप्राय २० दिवसांत मागवून घ्यावेत. त्यावर आक्षेप नसल्यास किंवा त्यांनी काहीही कळविले नाही तर तशी सुधारणा नियमामध्ये करण्यात येईल. |

| अ.क्र | विषय सूची घटक | विषय / मुद्दा | दि.२५/०७/२०१७ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| ६ | का.क्र.२८-अे<br>पोमसं कार्यालय | पोलीस कल्याण निधी नियमावलीमधील नियम ८ (२) (ग) (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.<br>पात्र खाजगी संस्था/बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच खाजगी व्यक्तींकडून पोलीस महासंचालक यांच्या पूर्व परवानगीने स्विकारलेल्या रुपये ५,००,०००/-पर्यंतच्या धनादेश/ धनाकर्ष स्वरुपातील देणग्या आणि शासनाच्या पूर्वपरवानगी स्विकारलेल्या रु. ५,००,००० / - पेक्षा जास्त रकमांच्या धनादेश / धनाकर्ष स्वरुपातील देणग्या.<br>मात्र, पोलीस विभागातील कामांशी संबंध येणारे बिल्डर / विकासक / बांधकाम कंत्राटदार / इफ्रास्ट्रक्चरर्स तसेच बांधकामाशी संबंधीत वाळू सिमेंट इत्यादिंचे विक्रेते / पुरवठादार, मद्य उत्पादक व विक्रेते, वाईन शॉप / बार / हॉटेल / रेस्टॉरंट अँड बार /इत्यादिंचे मालक, गुटखा / तंबाखु / सिगारेट / इत्यादींचे उत्पादक व विक्रेते व तत्सम व्यावसायीकांकडून देणग्या स्विकारता अथवा प्रस्तावित करता येणार नाहीत. तसेच रु.१०,०००/- पेक्षा कमी रकमांच्या देणग्याही स्विकारता अथवा प्रस्तावित करता येणार नाहीत. त्याचप्रमाणे ज्वेलर्स / सराफ व कोळसा खाण मालकांकडुनही देणग्या स्विकारता अथवा प्रस्तावित करता येणार नाहीत. अशी तरतूद आहे. तथापि,<br>१.) इफ्रास्ट्रक्चर्स हे मोठे बांधकाम व्यावसायिक आहेत. उदा. जे.कुमार, एल अँण्ड टी, एम.एम.आर.डी.ए. इ. तथापि, त्यांचा पोलीस विभागातील कामाशी वैयक्तिकरित्या संबंध येत नसल्याने त्यांच्याकडून व इतर मोठया Pvt.Ltd. आणि Public Ltd. कंपन्यांकडून देणग्या स्विकारता येतील.<br>२) बांधकामाशी संबंधित वाळू/सिमेंट इत्यादींचे विक्रेते /पुरवठादार यामध्ये वाळू विक्रेता/पुरवठादार यांचा पोलीस विभागाच्या कामाशी संबंध येतो परंतु सिमेंट विक्रेते/पुरवठादार किंवा सिमेंट उत्पादक कंपन्या यांचा पोलीस विभागाच्या कामाशी सहसा संबंध येत नसल्याने त्यांच्याकडून देणग्या स्विकारता येतील.<br>३) घटकांकडून देणग्यांचे प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये देणगीदार लोकप्रतिनिधी / नगरसेवक / सरपंच जि.प.सदस्य / आमदार / खासदार इ. कडून वैयक्तिक स्वरुपात देणग्या स्विकारण्यास परवानगी मागितली जाते तथापि हे देणगीदार वैयक्तिक असून त्यांच्याकडून पोलीस विभागावर दबाव आणण्याचा प्रयत्न होऊ शकतो म्हणून त्यांच्याकडून देणगी स्विकारण्यात येवू नये.<br>४) मद्य उत्पादन करणा-या डिस्टिलरी कंपन्यांकडून कोणत्याही प्रकारच्या देणग्या स्विकारण्यात येवू नयेत. | देणग्या स्विकारण्यास परवानगी देण्याबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/दे. अ. प्रत्यायोजन / १५४/ २०१७, दि.२१/७/२०१७ अन्वये परिक्षेत्रीय विपोमनि / पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र, पोउमनि/विपोमनि/अपर पोलीस महासंचालक दर्जाचे पोलीस आयुक्त,अपर पोमसं,रारापोबल, अपर पोमसं,प्रशिक्षण व खास पथके या अधिका-यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार पोलीस कल्याण निधी नियमावलीतील तरतुदींनुसार पो.अ./पोउमनि, पोआ व विपोमनि,अपोमसं यांनी कार्यवाही करावी.<br>इफ्रास्ट्रक्चर्स कंपन्याकडून /मोठया बांधकाम व्यावसायिकांकडून /सिमेंट कंपन्या /नामांकित हॉटेल व्यावसायिक यांच्याकडून देणग्या प्रस्तावित असतील तर त्या योग्य मार्फतीने पोलीस महासंचालक यांच्या मान्यतेसाठी या कार्यालयास सादर करावेत. व पोलीस महासंचालक यांची पूर्व मान्यता प्राप्त झाल्यानंतरच त्या स्विकारण्यात याव्यात.<br>लोकप्रतिनिधीकडून देणग्या स्विकारण्यात येवू नयेत. तथापि, खासदार/आमदार /नगरसेवक यांच्या फंडातून कल्याणकारी उपक्रमासंबंधातील कांही बांधकाम करून घेण्यास हरकत नाही. |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय सूची घटक</th><th>विषय / मुद्दा</th><th>दि.२५/०७/२०१७ च्या बैठकीतील ठराव</th></tr>
<tr>
<td>७</td>
<td>का.क्र. २८-अे पोमसं कार्यालय</td>
<td>
पोलीस कल्याण निधी उपक्रमांतर्गत, पो.क.नि. नियमावली, नियम ९(१)(ब) नुसार, पोलीस कल्याण निधीच्या सभासदांना, त्यांच्या मुलां/मुलींच्या शिक्षणासाठी पो.नि. व त्याखालील दर्जाचे पोलीस अधिकारी/कर्मचारी व लिपिक वर्गीय अधिकारी/कर्मचारी व वर्ग ४ च्या मुलांना सद्या खालीलप्रमाणे पुस्तक अनुदान देण्यात येत आहे.:-
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>अभ्यासक्रम</th><th>गुणांच्या टक्केवारीची अट</th><th>देय अनुदान रुपये</th></tr>
<tr><td>१.</td><td>५वी ते १०वी</td><td>८५% किंवा प्रमुख ३ विषयामध्ये अ-२ व त्यावरील श्रेणी</td><td>१,०००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>११वी / १२वी</td><td>८०%</td><td>२,०००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>वरिष्ठ महाविद्यालय /पोस्ट ग्रॅज्युएट/बी.ए बी.कॉम,एम.ए, बीएससी.,एम कॉम, हॉटेल मॅनेजमेंट इ.</td><td>७०%,</td><td>३,०००/-</td></tr>
<tr><td>४</td><td>अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा)</td><td>६५%</td><td>३,०००/-</td></tr>
<tr><td>५</td><td>वैद्यकीय पदवीका / डी.फार्मसी</td><td>६५%</td><td>३,०००/-</td></tr>
<tr><td>६</td><td>अभियांत्रिकी पदवी/पदव्युत्तर पदवी BE/ME</td><td>६५%</td><td>७,०००/-</td></tr>
<tr><td>७</td><td>वैद्यकीय /पशुवैद्यकीय पदवी/पदव्युत्तर पदवी / B pharm / M pharm</td><td>६५%</td><td>१५,०००/</td></tr>
</table>
तरी पुस्तक अनुदान वाढवून देण्याबाबत चर्चेअंती उचित निर्णय होणेस विनंती आहे.
</td>
<td>
मा.अध्यक्षांनी पुस्तक अनुदानासाठी गुणांची टक्केवारी मागील प्रमाणेच ठेवली असून, पुस्तक अनुदानामध्ये २५% प्रमाणे वाढ करण्याबाबत तसेच वैद्यकीय पदवीसाठी २० % नी पुस्तक अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत मान्यता दिलेली आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>अभ्यासक्रम</th><th>देय अनुदान रुपये</th><th>वाढीव अनुदान रुपये</th></tr>
<tr><td>१.</td><td>५वी ते १०वी</td><td>१,०००/-</td><td>१२५०/-</td></tr>
<tr><td>२</td><td>११वी / १२वी</td><td>२,०००/-</td><td>२५००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>वरिष्ठ महाविद्यालय /पोस्ट ग्रॅज्युएट/बी.ए बी.कॉम,एम.ए, बीएससी.,एम कॉम, हॉटेल मॅनेजमेंट इ.</td><td>३,०००/-</td><td>३७५०/-</td></tr>
<tr><td>४</td><td>अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा)</td><td>३,०००/-</td><td>३७५०/-</td></tr>
<tr><td>५</td><td>वैद्यकीय पदवीका / डी.फार्मसी</td><td>३,०००/-</td><td>३७५०/-</td></tr>
<tr><td>६</td><td>अभियांत्रिकी पदवी/पदव्युत्तर पदवी BE/ME</td><td>७,०००/-</td><td>८७५०/-</td></tr>
<tr><td>७</td><td>वैद्यकीय /पशुवैद्यकीय पदवी/पदव्युत्तर पदवी / B pharm / M pharm</td><td>१५,०००/</td><td>१८७५०/-</td></tr>
</table>
सदरचे वाढीव पुस्तक अनुदान पुढील शैक्षणिक वर्षापासून देण्यात यावे.<br>
<u>त्याप्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.</u>
</td>
</tr>
</table>

**परिशिष्ट - इ**

**ऐनवेळी उपस्थित झालेले मुद्दे.**

| अ. क्र. | विषय सूचक घटक | विषय / मुद्दा | दि.२५/०७/२०१७ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजय बावस्कर, पो.हवा./५१६, पो. अ., अकोला | ASI ची पदोन्नती प्रत्येक महिन्यात सेवानिवृत्त होणा-या रिक्त पदांबरोबर करावी. | आस्थापना शाखेशी संबंधीत मुद्दा असल्याने विपोमनि आस्था यांना मा.अध्यक्षांनी कार्यवाही करण्याबाबत लक्ष देण्यास सांगितले. |
| २ | अमरावती ग्रामीण महिला पो.शि./१४५६ मंदा सातपुते | पोलीस कर्मचा-यांना DCRG (मृत्यु नि सेवा उपदान)ची रक्कम लवकरात लवकर मिळण्याबाबत - | मुद्दा वेल्फेअरशी संबंधीत नसल्याने त्यांनी कर्मचारी वृंद परिषदेमध्ये मुद्दा मांडावा असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले. |
| ३ | श्री.प्रणव बच्छाव, पो.शि../१६१७, पो. अ., नाशिक ग्रामीण | कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मंत्रालयीन कर्मचा-यांना देखील मिळण्याबाबत - | शासनाचे धोरणनुसार सदरचा लाभ फक्त सेवेत असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचा-यांचे कुटुंबियासाठी असल्याने सदरचा मुद्दा अमान्य करण्यात आला. |

**परिशिष्ट - ई**

**पोलीस महासंचालक,म.राज्य, मुंबई यांनी दिलेली माहिती/दिलेले निर्देश.**

| अ.क्र | दि.२५/०७/२०१७ च्या बैठकीतील ठराव |
|---|---|
| १ | सद्या GST ही नवीन कर प्रणाली लागू झालेली आहे.. घटक प्रमुखांकडे जो पोलीस कल्याण निधी आहे त्यातून कांही उपक्रम राबविण्यात येतात. त्यासाठी कांही कंपन्याना/व्यक्तिंना बिले देण्यात येतात. त्यामध्ये वार्षीक उलाढाल रु. २० लाखापेक्षा जास्त असेल तर नियमानुसार GST रजिस्ट्रेशन अनिवार्य आहे. पोलीस कल्याण निधीचे नियमित लेखा परीक्षण करण्यासाठी व GST तसेच आयकर इत्यादी कर नियमितपणे भरणे नियमानुसार आवश्यक आहे. या कार्यालयात घाटकोपर जिमखाना हा उपक्रम चालविण्यात येतो. त्या उपक्रमाची वार्षीक उलाढाल रु.२० लाखापेक्षा जास्त होत असल्याने त्या उपक्रमाचे लेखांकन (Data Entry) व लेखापरीक्षण (Audit) त्याचप्रमाणे आयकर व GST इ. संबंधी कामकाज करण्यासाठी या कार्यालयाने CA चा सल्ला घेवून Association of Persons बनविले आहे. तरी सर्व घटक प्रमुखांनी आवश्यकता भासल्यास CA शी संपर्क साधून आयकर तसेच GST संबंधात आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. प्रत्येक परिक्षेत्रीय विपोमनि यांनी एका CA शी संपर्क साधून त्यांच्याकडून परिक्षेत्रातील जिल्ह्यांसाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन घ्यावी. |
| २ | राज्यात विविध पोलीस घटकांमध्ये पेट्रोलपंप चालविण्यात येत आहेत तसेच काही घटकांत पेट्रोलपंप चालविण्यास परवानगी देण्यात येत आहे, त्यापासून मिळणा-या नफ्याचा उपयोग घटक पोलीस कल्याण निधी मार्फत चालविण्यात येणा-या विविध योजनांसाठी करावा. तसेच कल्याण निधी वृध्दींगत व्हावा यासाठी या व्यतिरिक्त उत्पन्नाची इतर काही साधने असल्यास ते ही सूचवावेत. |
| ३ | शहरातील मुख्यालयाच्या ठिकाणावरुन त्याच शहरातील पोलीस कार्यालयाच्या अधिकारी / कर्मचा-यांना जाण्या-येण्यासाठी पिकअप वाहन/बसची व्यवस्था घटक प्रमुखांनी करावी. |
| ४ | घटक प्रमुखांनी जिल्हा ठिकाणापासून दुर्गम भागात कर्तव्यावर असणा-या कर्मचा-यांसाठी बस सुविधा उपलब्ध करुन द्यावी.तसेच आपात्काळात ॲम्ब्युलन्सची तात्काळ व्यवस्था होईल याची दक्षता घ्यावी.<br>त्या अनुषंगाने विपोमनि नाशिक परिक्षेत्र, नागपूर परिक्षेत्र व पोउमनि गडचिरोली परिक्षेत्र यांनी नंदुरबार, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्हयांसाठी ॲम्ब्युलन्स घेण्यासाठी प्रोजेक्ट रिपोर्ट बनवून तो या कार्यालयास सादर करावा. त्यांच्याकडे ॲम्ब्युलन्स किती आहेत त्याची सद्य:स्थिती (Condition) काय आहे ते ही कळवावे. |